**<u>एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम</u>**
**वित्तिय वर्ष २०२६-२७ करीता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) या बाबीखाली माहे मार्च व एप्रिल, २०२६ च्या वेतनाकरीता अनुदान वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : बीयुडी - ०४२६/प्र.क्र. १८/प्रशि - ३**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १०/०४/२०२६

**<u>वाचा</u>** :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २०/०१/२०१४.
२) लेखा अधिकारी (सीपीटीपी) वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे पत्र क्रमांक वनामती /सीपीटीपी/वेतन/निधी/२६-२७/२०२६/१३४९, दिनांक ३०/०३/२०२६.

**<u>प्रस्तावना</u>** :-

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २०/०१/२०१४ नुसार शासन सेवेमध्ये सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील विविध संवर्गातील अधिकाऱ्यांसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता लेखाशिर्ष ए-४, २०७०-इतर प्रशासनिक सेवा, (००)(११),वनामती, नागपूर या संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदान (२०७००८६२) या लेखाशिर्षाखाली ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दीष्टाखाली या संस्थेला माहे मार्च, २०२६ च्या वेतनाकरिता निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय</u>** : -

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता लेखाशिर्ष ए-४, २०७०-इतर प्रशासनिक सेवा, (००)(११), वनामती, नागपूर या संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदाने (२०७००८६२) या लेखाशिर्षाखाली ३६-सहायक अनुदाने ( वेतन ) या उद्दीष्टाखाली रु. २,००,५७,०००/- ( अक्षरी रूपये दोन कोटी सत्तावन हजार फक्त ) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर आहे.

२. सदर लेखाशीर्षाखाली वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेने सन २०२६-२७ या अर्थसंकल्पीय वर्षात माहे मार्च ते जून, २०२६ च्या वेतनाकरिता रू. ४४,००,०००/- (अक्षरी रूपये चव्वेचाळीस लक्ष फक्त ) अनुदानाची मागणी केली आहे

३. तथापि, अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण, व्यवस्थापन व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) एकूण रू. २०,०५,७००/- ( अक्षरी रूपये वीस लक्ष पाच हजार सातशे फक्त ) इतके अनुदान उपलब्ध असल्यामूळे, वनामती प्रशिक्षण संस्थेस ३६-सहायक अनुदान वेतन या उद्दीष्टाखालील मार्च व एप्रिल, २०२६ च्या वेतनाकरिता एकूण रु. २०,००,०००/- ( अक्षरी रूपये वीस लक्ष फक्त ) इतका निधी अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीव्दारे (बीम्स) वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर प्रशिक्षण संस्थेस पुढील अटी व व शर्तींच्या अधीन राहून वितरित करण्यात येत आहे.

अ) अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोषागारातून आहरित करण्यापूर्वी तसेच खर्च करताना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तिय नियमावली, अर्थसंकल्पिय नियम पुस्तिकेतील तरतूदी व सर्व अटी, शर्तींचे पालन करणे ही जबाबदारी संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर यांची राहील.

आ) संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या संस्थेने खर्च वितरीत अनुदानाच्या मर्यादेत ठेवावा व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाइतकी देयके कोषागारात सादर करुन रक्कम कोषागारातून आहरीत करण्याची दक्षता घ्यावी.

इ) प्रत्यक्ष झालेल्या खर्चाइतकी देयके कोषागारात सादर करुन रक्कम आहरीत केल्यानंतर आहरीत केलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीषार्खाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र १५ दिवसाच्या आत शासनास सादर करावे.

ई) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचा खर्च ताळमेळ करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

उ) वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर या संस्थेने वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र (UTILIZATION CERTIFICATE), विहीत कालावधीत न चुकता महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर व शासनाला सादर करावे.

४. वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या संस्थेने उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके ठेवण्यात यावीत. सदर लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर यांना राहतील व त्याकरीता वनामती त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१०१२३५२३२९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANISHA PRAVIN KINI

Digitally signed by MANISHA PRAVIN KINI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=108CBDAC08C7E940866A8FC97BFE7F861BF192CE9DD6B4D0924623149A51F9ED, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BE59ABCE2E8B3A2F8B88D3CB21BEE92FD81E2ED85D5357C0A88629268305FCA7, cn=MANISHA PRAVIN KINI
Date: 2026.04.10 12:36:16 +05'30'

**( मनिषा किणी )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव ( सेवा ) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे वरीष्ठ स्वीय सहायक.
२. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था ( वनामती ), नागपूर.
३. वरिष्ठ प्रशासनिक व लेखाधिकारी, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था वनामती, नागपूर. ( ३ जादा प्रतींसह)
४. सह संचालक, लेखा व कोषागारे, (संगणक शाखा), मुंबई.
५. वरिष्ठ कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर.
६. उप कोषागार कार्यालय, नागपूर.
७. वित्त विभाग ( व्यय-४/अर्थसंकल्प-३ ), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग ( कार्यासन क्रमांक -२५ ) मंत्रालय मुंबई-३२.
९. महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा ), महाराष्ट्र-१,मुंबई.
१०. महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा ), महाराष्ट्र-२,नागपूर
११. निवड नस्ती / कार्यासन प्रशि - ३